शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

गजानन महाराज पालखी मार्गाबाबत शिवसेनेची मागणी

## जुनाच मार्ग सुरु करावा!



**जालना । प्रतिनिधी -** गजानन महाराज पालखी सोहळ्याचा मार्ग बदलण्यात आला असून, यामुळे नागरिक, भाविक व व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यासंदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे शहर प्रमुख दुर्गेश किशनलाल काठोठीवाले यांनी सदर बाजार पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांना निवेदन देत जुनाच मार्ग सुरु ठेवण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी पालखीचा मार्ग गेल्या दोन-तीन वर्षात बदलून तो अडचणीचा करण्यात आला आहे. बदललेल्या मार्गावर अस्वच्छता, चिखल व साचलेल्या पाण्यामुळे भाविकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत वृद्ध, महिला व लहान मुलांसाठी ही यात्रा कष्टदायक ठरत आहे.

गजानन महाराज पालखीचा पूर्वीचा पारंपरिक मार्गच पुन्हा सुरू करावा, कारण तो अधिक सोयीस्कर, मोकळा आणि भाविकांसाठी अनुकूल आहे. याच मार्गाने वर्षानुवर्षे यात्रा पार पडत होती, त्यामुळे नागरिकांना तो मार्ग अधिक परिचित आहे.

शहरातील व्यापारी, स्थानिक नागरिक व भाविक वर्गातून देखील या मागणीला पाठिंबा मिळत आहे.

निवेदनावर शिवसेनेचे शहर प्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांच्यासह राजेंद्र पोरवाल, अनिल वाघमारे, सुनील नंद, प्रकाश पवार, निखील घारेगावकर, सखाराम मिसाळ, शंकर नमेटला, बालाजी सुवर्णकार, शांतीलाल गादीया, रमण गादीया, आकाश जांगडा, गिरीश सिनगारे, चेतन गुप्ता, गोविंद गुप्ता, राधेश्याम जैस्वाल, बजरंग राजपूत, आकाश जैस्वाल, राधाकृष्ण दुसाने, मनोज मालोदे, प्रमोद मालोदे, रवी नवघरे, नरेश जैस्वाल, सुदेश वाघमारे, बापू शिंदे, आकाश खर्डेकर, दिनेश डहाळे, विनायक सावरकर, चंद्रशेखर पोरवाल, रवींद्र अवधूत, देवेंद्र जैस्वाल, सतपाल काठोठीवाले, विशाल शेडुते, कुणाल अन्नादास, आकाश खर्डेकर, गणेश मालोदे, सचिन जैस्वाल, मुकेश जांगडे आदींची नावे आहेत.

## पारशी टेकडी पोखरून गौनखनीज काढणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करा - नंदा पवार

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पारशी टेकडीचा डोंगर पोखरुन गौण खनिज काढून नेणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करून पारशी टेकडीचे संवर्धन करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या तथा जालना जिल्हा महिला काँग्रेसच्या जिल्हाधक्षा नंदा पवार यांनी केली आहे.

पारशी टेकडी पोखरून गौनखनीज काढून नेण्यासंदर्भात नंदा पवार, सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे शहर जिल्हा सरचिटणीस गणेश चांदोडे, जया आठवले, राहुल रत्नपारखे आदींनी गुरूवारी ( दि. १७) जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना शहर हे बियाणांची पंढरी व स्टीलनगरी म्हणून ओळखले जाते,जालना शहराबाहेर असलेल्या समृद्धी महामार्गामुळे जालना शहराला महत्त्व प्राप्त झाले आहे. याच समृद्धी महामार्गाला लागून असलेली पारशी टेकडी ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे.या टेकडीवर



जालना जिल्हा प्रशासनाच्या नेतृत्वात विविध सामाजिक संस्था संस्थांच्या माध्यमातून टेकडी संवर्धनाची कामे हाती घेण्यात आली आहेत. पर्यावरणाचा समतोल राखला जावा म्हणून पारसी टेकड़ी या डोंगरावर कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने जलसंवर्धनाचे कामे झालेली आहेत. तसेच ३.५ लाख वृक्षांची लागवड करण्यात आलेली असून त्यांचेसंवर्धन कार्य सुरु आहे. प्राण्यांसह विविध पशू पक्षी आणि जीवजंतूचा नैसर्गिकआधिवास तेथे आहे.

नैसर्गिक साधन संपत्ती असलेल्या पान ३ वर

## संचमान्यता व विद्यार्थ्यांचे लाभ देण्यासाठी ३० सप्टेंबर हाच निकष कायम ठेवावा

मराठवाडा शिक्षक संघाची मागणी!

**जालना । प्रतिनिधी -** शाळांना संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांतर्गत मिळणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबर हाच निकष कायम ठेवावा त्यात बदल करू नये असी मागणी मराठवाडा शिक्षक सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की,आतापर्यंत शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत मिळणारे लाभ हे ३० संप्टेबरच्या पटसंख्येवर दिले जातात परंतु राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी २६ जून २०२५ रोजी शिक्षणाधिकारी यांच्या बैठकीत यावर्षी पासून शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत देण्यात येणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबरच्या विद्यार्थी पटाऐवजी ३१ जुलै च्या पटावर संचमान्यता व लाभ देण्याचे सुचित केले आहे.हा संदर्भ देऊन शिक्षणाधिकारी (मा.) बुलढाणा यांनी तसे आदेश त्यांच्या जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना निर्गमित केले आहेत.तसे आदेश राज्यातील शिक्षणाधिकारी आप आपल्या जिल्ह्यात निर्गमित करतील त्या अगोदरच आपण मराठवाडा शिक्षक संघाच्या या निवेदनाचा विचार करावा कारण पंधरा जूनला शाळा सुरू होतात. त्यानंतर एक ते दीड महिना विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू राहते. त्यानंतर सर्व प्रवेशीत विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टरला नोंद घेणे, विद्यार्थी प्रमोशन, युडायस, सरलला अपडेट करणे,आधार अपडेट करणे या सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेचा पट तयार होते. ही सर्व प्रक्रिया ३१ जुलै पर्यंत पुर्ण होणे शक्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. परिणामी शाळेची पटसंख्या आणि आधार अपडेट व सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेची ऑनलाईन पटसंख्या यात तफावत राहणार आहे. त्यामुळे पटसंख्या असूनही सर्व ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण न झाल्यामुळे शिक्षक पान ३ वर

युवा आदर्श

### खलुकी ...

भाव फुले पायघड्या
येई सद्गुरू पालखी
मी साधा भोई झालो
त्यांची मजवर मालकी
गुरु मंदिरात कार्यरत
कामे काही न हलकी
भक्तीत नसे आतबट्टा
अंदाजपत्र रे शिलकी
श्रीमंत श्रीहरी स्नेहात
दागिना मोल निलखी
दिले भरभरून इतके
काय मागावे आणखी
ईशसेवा करता पटली
स्वताची स्वता ओळखी
षड्रिपुशी संबंध तोडता
दुष्कृत्ये ती अनोळखी
खूप केली पापे आधी
आपण सारे समदु:खी
जाण ये परम्यात्म्याची
बनलो जगी सर्व सुखी
सम्राट होतो पातकांचा
पुण्य संचित खलुकी
भक्त संप्रदायी संम्मील
असूनही क्षुद्र क्षुल्लकी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## एक्युप्रेशर, सुजोक, वायब्रेशन व चुंबकीय थेरपी शिबिरात चारशे जणांवर उपचार; जालना माहेश्वरी समाज व आनंद नगरी परिवाराचा संयुक्त उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** जालना माहेश्वरी समाज दैनिक आनंद नगरी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते १५ जुलैदरम्यान महेश भवन आणि भारती लॉन्स या दोन ठिकाणी घेण्यात आलेल्या एक्युप्रेशर, सुजोक, वायब्रेशन व चुंबकीय थेरपी शिबिरात ४०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी व मोफत नैसर्गिक उपचार करण्यात आले.

या शिबिरात थेरेपिस्ट सुभाष सोनूने, सौ. स्वाती काळे, कार्तिक काळे यांनी मणक्याचे विकार, सायटिका, सांधेदुखी, पाठीचा त्रास, अर्धांगवायू, लकवा, टेंशन व डिप्रेशन, श्वासोच्छ्वासाचे विकार, मधुमेह, ब्लड प्रेशर, थायरॉईड, ॲसिडिटी, पचनविकार, गॅसवजन वाढणे / कमी होणे, कान, नाक, घसा यांचे विकार, अर्धशिशी, मेंदूशी संबंधित विकार, स्त्रीरोग, मासिक पाळीचे त्रास, हात-पायाला मुंग्या येणे, नसा आखडणे, डोळ्यांचे त्रास व दृष्टीदोष, लहान मुलांचे वाढीचे त्रास, पचन बिघाड आदी विकारावर कोणत्याही औषधाविना संपूर्ण नैसर्गिक उपचार व मार्गदर्शन केले. कांस्य थाळी (फूट मसाज) या नव्या संकल्पनेतून अनेक आराम मिळाल्याच्या प्रतिक्रिया अनेक रुग्णांनी यावेळी दिल्या.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी आनंद नगरीचे मुख्य संपादक शिवरतन मुंदडा, संपादक रवींद्र बांगड, पान ३ वर



नमो शेतकरी महासन्मान निधी योजनाचा थकित निधी शेतक-याच्या खात्यावर जमा करा

## नमो शेतकरी महासन्मान योजना पूर्ववत चालू करा - बाबासाहेब कोलते

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने सुरू केलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा थकित निधी गेल्या एक वर्षापासून शेतक-याला मिळाला नसून तो तात्काळ शेतक-याच्या खात्यावर जमा करून नमो शेतकरी महासन्मान योजना पूर्ववत चालू ठेवण्याची मागणी स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले आहे की, भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी महाराष्ट्रातील व भारत देशातील सर्व शेतक-यांसाठी पंतप्रधान किसान सन्मान योजना ही अल्पभूधारक शेतक-यांसाठी सुरू केली असून देशातील प्रत्येक शेतक-याला एका वर्षाला ६000/- रुपये म्हजणे प्रत्येकी चार महिन्याला रुपये २000/- चा हप्ता केंद्र शासनाकडून दिला जातो. केंद्र शासनाच्या धर्तीवरच महाराष्ट्र राज्यातील अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्न वाढीसाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना तत्कालीन भाजपा-शिवसेना महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी सुरू केली होती. परंतु राज्य सरकारची ही नमो शेतकरी महा सन्मान योजनेचा फक्त एक वर्षासाठीच त्याचा शेतकरी बांधवांना लाभ मिळाला असून गेल्या एक वर्षापासून राज्य शासनाच्या नमो शेतकरी महा सन्मान योजनेचा निधी प्रत्येकी चार महिन्याला रुपये २000/- म्हणजे वार्षिक रुपये ६000/- मिळालेला नाही. केंद्र शासनाप्रमाणे पान ३ वर

सदर बाजार डीबी पथकाची कारवाई

## मोटारसायकल चोरी प्रकरणात दोन आरोपी अटकेत, ५.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** सदर बाजार पोलीस ठाणे अंतर्गत डीबी पथकाने दोन मोटारसायकल चोरट्यांना अटक करत ५ लाख २० हजार रुपयांचा एकूण ८ मोटारसायकल्सचा मुद्देमाल जप्त केला आहे.

डीबी पथकातील पोहेकॉ. ५९३ आर.डी. रंगे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, लोधी मोहल्ला भागात चोरीस गेलेली मोटारसायकल असल्याची माहिती मिळाली. पोलिस निरीक्षक संदीप भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि शैलेश म्हस्के पान ३ वर



वंचित बहुजन आघाडी मंठा तालुका आढावा बैठक

## आगामी निवडणुकांची तयारी सुरू!



**मंठा । प्रतिनिधी -** आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शासकीय विश्रामगृह मंठा येथे दिनांक १७ जुलै २०२५ रोजी बैठक आयोजन करण्यात आले होते यावेळी वंचित बहुजन आघाडी तालुका पदाधिकाऱ्यांचा संघटनात्मक कामाचा आढावा घेण्यात आला व आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी लवकरच सर्कल निहाय संघटन समिक्षा व संवाद दौऱ्याचे आयोजन करण्यात संदर्भात पान ३ वर

# संपादकीय

## सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज तेरावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचशया मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. बाबूमोशाय....... बाबू म ोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा... जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है. राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## ज्योतिष प्रबोध वर्गाच्या परीक्षेत वे.मु. अविनाश कुलकर्णी यांचा तृतीय क्रमांक

**अंबड । प्रतिनिधी -** श्री वागीश वेद विज्ञान संस्था भूम, अंतर्गत श्री योगीराज ज्योतिष अभ्यास मंडळ यांनी ज्योतिष शास्त्राचा प्रचार,प्रसार,विस्तार व संशोधन या उद्देशाने सुरु केलेल्या ऑनलाईन ज्योतिष प्रबोध वर्गाची ३० मे २०२५ धाराशिव येथे परिक्षा संपन्न झाली. सदर परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये अंबड शहरातील वे.मु.अविनाश कुलकर्णी यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पंचांगकर्ते मोहन धुंडीराज दाने (सोलापुर) यांची तर अध्यक्षस्थानी खगोलतज्ञ म धुसुदन बेलसरे (पुणे), यांच्यासह वे.मु.ज्यो. शास्त्री कृष्णा गुरुजी पात्रुडकर व वे.मु.गणेश सुरेश वैद्य आदींची उपस्थिती होती.

या परीक्षेत श्री.वे.मु. कमलकिशोर सत्यकुमार कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक,श्री.वे.मु. पवन गुरुजी जोशी यांनी द्वितिय तर श्री.वे.मु अविनाश कुलकर्णी यांनी तृतीय क्रमांक मिळवला. नक्षत्र प्रोजेक्टमध्ये सौ.स्वाती मोने पूणे यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्हासह बक्षिस म्हणून रोख रक्कम देण्यात आली.यामध्ये श्री.वे.मु.ज्यो. शास्त्री कृष्णा गुरुजी व ज्योतिष अभ्यासक बाळकृष्ण जोशी एकदलेकर व वे.मु.गणेश गुरुजी यांचा मोलाचा सहभाग होता. या अभ्यास वर्गामध्ये राज्यातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

# मला भावलेले डॉ दीपक टिळक

'केसरी' वृत्तपत्राचे विश्वस्त संपादक डॉ.दीपक टिळक यांचे १६ जुलै २०२५ रोजी निधन झाले .त्यांच्या निधनामुळे जणू माझी व्यक्तिगत हानी झाली.माझ्या जीवनातील,करिअरमधील त्यांचे स्थान,महत्व माझ्या डोळ्यापुढे उभे राहिले आणि मन गहिवरून गेले.

१९८४ साली मी पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूट मधील वृत्तपत्र विद्या विभागातून पदवी घेतली. त्याचवेळी माझा वर्गमित्र बाबासाहेब काझी ( त्यावेळी तो डॉक्टर झालेला नव्हता !) याच्या सांगण्यावरून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस च्या एम ए ( समाज कार्य) या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला. लेखी परीक्षा,समूह चर्चा आणि मुलाखत होऊन माझी त्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली.मी जून १९८४ मध्ये संस्थेत आणि संस्थेच्या वसतिगृहात प्रवेश घेतला.दोन आठवड्यातच माझ्या लक्षात आले की,नोकरी करीत हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुभा नाहीय आणि शिष्यवृत्ती डिसेंबर महिन्यापासून सुरू होणार होती.त्यामुळे मला प्रश्न पडला की ,जून ते डिसेंबर या सहा महिन्यांचा खर्च कसा भागवायचा ?

त्याच दरम्यान केसरी ची उपसंपादक आणि इतर काही पदांसाठी आलेली जाहिरात पाहून मी उपसंपादक पदासाठी अर्ज केला. त्यावेळी मला काही जणांनी सांगितले की,तुला केसरीत नोकरी हवी आहे,तर तू जयंतरावांना भेट तर तुझे काम होईल. (त्यावेळी लोकमान्य टिळक यांचे नातू जयंतराव हे केसरीचे विश्वस्त होते. तर चंद्रकांत घोरपडे हे संपादक होते.) पण मी ठरविले होते की,केवळ गुणवत्तेवर निवड होणार असेल तरच केसरीत रुजू व्हायचे,वशिलेबाजी करून नव्हे.पण खरोखरच कुठल्याही प्रकारची वशिलेबाजी न करता माझी निवड झाली. टाटा इन्स्टिट्यूट सोडून मी १ जुलै १९८४ रोजी केसरी वृत्तपत्रात रुजू झालो.

जयंतराव होते, तो पर्यंत तेच केसरीचे सर्व कामकाज बघायचे. तर त्यांचे चिरंजीव दीपक टिळक हे व्यवस्थापक म्हणून काम बघायचे. ते अतिशय ऋजु व्यक्तिमत्वाचे, मितभाषी असे होते. आपण लोकमान्य टिळकांचे पणतू आहोत,केसरी चे प्रमुख आहोत,असा कुठल्याही प्रकारचा अहंकार त्यांच्यात नव्हता.काही कारणामुळे मी केसरीत काही महिने काम करून केसरी प्रकाशनाने सुरू केलेल्या साप्ताहिक सह्याद्री चा विशेष प्रतिनिधी म्हणून काम करायला लागलो. अरुण ताम्हणकर हे त्यावेळी साप्ताहिक सह्याद्री चे संपादक होते.वर्षभर मी सह्याद्री साठी काम केले. मुक्त पत्रकारिता कितीही आदर्श वाटत असली तरी, ती तशी करण्यासाठी तुमच्या घरची ऐपत तरी असली पाहिजे किंवा भणंगासारखे जीवन जगण्याची तुमची तयारी असली पाहिजे हे मला त्या वर्ष भराच्या अनुभवातून कळून चुकले आणि मी रीतसर आर्थिक स्थैर्य देऊ शकेल , अशी नोकरी करण्याच्या निर्णयाप्रत येऊन पोहचलो.अर्थात त्यासाठी मला केसरी आणि सह्याद्रीत काम केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक ठरणार होते. त्यासाठी मी दीपक टिळक यांची भेट घेऊन,त्यांना खरे काय ते सांगून टाकले. त्यांनी जराही विचार न करता,लगेच







त्यांच्या लेखनिकास बोलावून घेऊन केसरी आणि सह्याद्री च्या अनुभवांची दोन स्वतंत्र प्रमाणपत्रे मला लगेच करून दिली आणि ती प्रमाणपत्रे घेऊनच मी तिथून बाहेर पडलो.पुढे ती प्रमाणपत्रे मी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन च्या जनसंपर्क अधिकारी आणि मुंबई दूरदर्शन केंद्राच्या निर्मिती सहायक पदासाठी केलेल्या अर्जासोबत जोडली.

यापैकी माझी निवड निर्मिती सहायक पदासाठी होऊन मी दूरदर्शन केंद्रात रुजू झालो. तिथे काही वर्षे राहून महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालयात जिल्हा माहिती अधिकारी पदासाठी अर्ज केला,तेव्हाही मला केसरी आणि सह्याद्रीची अनुभवांची प्रमाणपत्रे कामी आली.

आज मागे वळून पाहताना लक्षात येते की,किती सहजासहजी दीपक टिळक यांनी मला अनुभवांची प्रमाणपत्रे दिली! मी केसरी मध्येच सोडून गेलो होतो आणि सह्याद्री मध्येच सोडून जात होतो तरी एका शब्दाने त्यांनी मला जाब विचारला नाही की, उलटसुलट काही सुनावले नाही. या त्यांच्या दिलदार स्वभावामुळे मी त्यांचा कायमचा आदर करू लागलो. पुढे कधी पुण्यात गेलो की,सहज म्हणून केसरी कार्यालयात गेलो की त्यांची सौजन्यपर भेट मी अवश्य घेत असे.

**अल्प परिचय.**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पणतू व गोवा मुक्ती चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेतृत्व करणारे ,बारा वर्षे खासदार (राज्यसभा सदस्य) आणि सोळा वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष राहिलेले जयंतराव टिळक यांचे सुपुत्र असलेल्या दीपक टिळक यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९५२ रोजी झाला होता.

उच्च विद्याविभूषित असलेल्या दीपक टिळक यांनी वृत्तपत्र व्यवस्थापन या विषयात पी.एचडी संपादन केली होती. १९८० च्या सुमारास ते केसरी मध्ये कार्मिक व्यवस्थापक म्हणून रुजू होऊन पुढे सरव्यवस्थापक झाले.ते २००२ पासून केसरीचे मुख्य संपादक झाले.देशातील अग्रगण्य असलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या १५ वर्षांच्या कुलुगुरूपदाच्या कारकिर्दीत त्यांनी विविध विभाग सुरु करून या विद्यापीठाला नवी दिशा दिली. २०००-२००१मध्ये वृत्तपत्रविद्या विभाग तर २००३-०४ या वर्षात संगणक शास्त्र विभाग त्यांनी सुरु केला. वृत्तपत्रविद्या विभागात त्यांनी २००७ मध्ये फोटोग्राफी-डिजिटल आर्ट, ऍनिमेशन, व्हीएफएक्स , एव्हिड असे कालानुरूप अभ्यासक्रम सुरु केले. त्यामुळे एरव्ही अत्यंत महागडे असलेले हे अभ्यासक्रम विद्यार्थांना परवडतील अशा शुल्कामध्ये उपलब्ध झाले. या बरोबरच जपानी भाषेचे महत्व ओळखून त्यांनी अभ्यासक्रम सुरू केले. त्यांच्या या योगदानाबद्दल जपान सरकारने त्यांना २०२१ मध्ये सन्मानित केले होते. त्यांच्या कारकिर्दीतच या विद्यापीठाला बी ++ असे नॅक मूल्यांकन मिळाले. पुढे ते या विद्यापीठाचे कुलपती ही होते.

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष म्हणूनही डॉ दीपक टिळक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि केसरी वृत्तपात्रासाठी भरीव योगदान देतानाच वसंत व्याख्यानमाला आयोजित करणाऱ्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था,रोझ सोसायटी, अनाथ हिंदू महिलाश्रम, अशा अनेक संस्थांच्या कामातही त्यांचे अतुलनीय योगदान होते.ते उत्तम ज्युदो पटू होते. डॉ दीपक टिळक यांचे सुपुत्र रोहित हे काँग्रेसचे नेते आहेत. त्यांनी पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघातून २००९ आणि पुन्हा २०१४ मध्ये निवडणूक लढवली होती.मात्र दोन्ही वेळा ते पराभूत झाले होते.असो.

लोकमान्य टिळक हे पणजोबा आणि जयंतराव टिळक हे वडील अशा दिग्गज व्यक्तिमत्वाच्या छायेत राहूनही डॉ दीपक टिळक यांनी स्वतःचे स्वतंत्र व्यक्तीमत्व घडविले होते. डॉ दीपक टिळक यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


**देवेंद्र भुजबळ**
**निवृत्त माहिती संचालक**
**९८६९४८४८००**

# शेतकऱ्यांचे जीवन एकदा तरी जगून पहा!

शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी शेतात दिवसरात्र कष्ट व मेहनत करून अन्नधान्य पिकवतो, आणि अख्या जगाला पोसतो. अख्या जगाला पोसण्याची ताकद फक्त शेतकऱ्यांच्या मनगटात आहे. शेतीची चांगली मशागत झाली आणि मृग नक्षत्राला आरंभ झाला की, सगळे शेतकरी शेतात पेरणी करतात. पेरणीसाठी लागणारे बी-बियाणे व खते खरेदी करण्यासाठी सावकाराचे कर्ज काढतात. मग मृग नक्षत्रानंतर थोडाफार पाऊस पडला की, सगळे शेतकरी शेतात जाऊन एकदाची पेरणी करून मोकळे होतात. पेरणी झाल्यावर शेतकऱ्यांचे लक्ष सारखे आभाळाकडे असते. मनासारखा पाऊस पडला की शेतकरी आनंदात न्हाऊन निघतात. आणि पाऊस वेळेवर नाही पडला, पावसाने शेतकऱ्यांची साथ सोडली की, मग मात्र शेतकरी अतिशय दुःखी व निराश होतात. पावसाची आतुरतेने वाट पाहतात. सारखे आभाळाकडे डोळे लावून बसतात. पाऊस आज ना उद्या पडेल या आशेवर ते एकेक दिवस मागे ढकलतात. पावसाने हुलकावणी दिल्यामुळे शेतकऱ्यांचे मन कुठेच लागत नाही. शेतकरी चिंताग्रस्त व भयभीत झालेले असतात. शेतात उगवलेले पीक पावसाअभावी उन्हाच्या तीव्र उष्णतेमुळे जाग्यावरच करपून जाते. शेतकऱ्यांना पावसाची नितांत गरज असते पण पाऊस मात्र काही बरसायचे नाव घेत नाही. शेतकऱ्यांनी पेरणीला, शेत मशागतीला, फवारणीला व नांगरणीला आहे तेवढा पैसा लावून, सगळा पैसा पार केलेला असतो. शेतकऱ्यांपुढे आता जीवन जगण्याचा प्रश्न निर्माण झालेला असतो. त्यांना घर प्रपंच चालवणे अवघड झालेले असते. घरात खाणारी तोंडे जास्त असल्यामुळे घरातील सदस्यांची खाण्यापिण्याची आबाळ होत असते. आणि त्यातच मुलांचे शिक्षण व मुलींचे लग्न, सावकाराचे वाढते कर्ज आणि उन्हाच्या तडाख्याने जळत चाललेली शेती हे नजरेसमोर तरळत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे म ोठी समस्या निर्माण होते. शेतकरी नैराश्याच्या खाईत लोटले जातात. शेतकऱ्यांपुढे जगावे की मरावे? हा प्रश्न निर्माण होतो. यातूनच शेतकरी आत्महत्येसारखे प्रकरणे घडत आहेत. शासन देखील शेतकऱ्यांचा जरासाही विचार करत नाही. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घ्यायला कोणीच तयार नसतो. राज्य शासन व केंद्र शासन राजकारण करण्यात व्यस्त असतात. शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा कोणापुढे मांडाव्यात आणि आपले मन कोणापुढे मोकळे करावे ? हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. ज्या मायबाप सरकारला मोठ्या आशेने शेतकऱ्यांनी, कष्टकऱ्यांनी व कामगारांनी निवडून दिलेले असते, तेच सरकार आता शेतकऱ्यांच्या मुळावर बसले आहे. महाराष्ट्रात काही भागात पाऊस मुसळधार बरसत आहे तर काही भागात पावसाने चक्क काढता पाय घेतल्यामुळे शेतकरी निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे पण लातूर, परभणी, नांदेड व बीड जिल्ह्यात काही ठिकाणी पाऊस तुरळक प्रमाणात पडत आहे. तेथील पिके पावसाअभावी सुकून जात आहेत. या भागातील शेतकरी चिंताग्रस्त आहेत.



शेतकऱ्यांनी आहे तेवढा पैसा पेरणीवर खर्च केला आहे. आता जगण्यासाठी शेतकऱ्यांकडे काहीच राहिले नाही. म्हणून बहुतांश शेतकरी आत्महत्येच्या विचारात आहेत. प्रशासन देखील जाणीवपूर्वक शेतकऱ्यांकडे पाठ फिरवत आहे. शेतकऱ्यांना आता कोणीच वाली राहिला नाही, म्हणून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक वाढले आहे. दररोज वर्तमानपत्रात शेतकरी आत्महत्येची एक तरी बातमी वाचायला मिळतेच. महाराष्ट्रातील लातूर जिल्हा हा सर्वाधिक दुष्काळाच्या सावटाखाली आहे. या जिल्ह्यातील काही भागात आतापर्यंत एकही मुसळधार पाऊस पडला नाही. शेतकऱ्यांना आर्थिक टंचाईमुळे आणि हाताला काम मिळत नसल्यामुळे जगणे मुश्किल झाले आहे. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर जराही हास्य नाही. प्रशासन शेतकऱ्यांची व शेतमजुरांची दखल न घेता आपल्याच धुंदीत जीवन जगत आहे. प्रशासन शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण करून निवडून मात्र येत आहे. आणि निवडून आल्यावर पाच वर्ष शेतकऱ्यांकडे पाठ फिरवत आहे. देशात सर्वात जास्त राजकारण हे शेतकऱ्यांच्या नावावर केले जाते. राजकारणाचा मूळ गाभा हा शेतकरी आहे. पण हाच शेतकरी आज जगावे की मरावे? या विचारात आहे. दुष्काळ मात्र शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. मग तो ओला दुष्काळ असो किंवा कोरडा दुष्काळ असो...एक तर पाऊस पडतच नाही आणि पाऊस पडला की सगळा कहरच करून टाकतो, शेतातील सगळे पीक मुसळधार पावसाच्या तडाख्याने जमीन दोस्त होते. शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक अतिवृष्टीमुळे भुईसपाट होते. शेतकरी दुहेरी संकटात अडकतो. पाऊस पडू लागला की, अतिवृष्टी होते आणि पाऊस पडायचा थांबला की दुष्काळाचे सावट पसरते. म्हणजे शेतकऱ्यांच्या नशिबी एकतर दुष्काळ नाहीतर अतिवृष्टी. शेतकऱ्यांचे जीवन कायमच या दुष्टचक्रात अडकले आहे. जगात एका पेक्षा एक श्रीमंत लोक आहेत. त्यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त पैसा आहे. तो नको त्या गोष्टीवर नको तेवढा पैसा उधळतात. त्यांना पैसा म्हणजे हातावरचा मळ वाटतो. अशा श्रीमंत लोकांना शेतकऱ्यांची, कामगारांची, कष्टकऱ्यांची व शेतमजुरांची जराही सहानुभूती राहिली नाही. ते आपल्या मासिक पगारातील थोडासा हिस्सा शेतकऱ्यांना व गरिबांना देण्यासाठी कधीच तयार नसतात. दररोज हजारो रुपये दारू व मटक्यात उधळतात. तमाशातील नाच्या आणि वेश्यावर पैशाचा पाऊस पाडतात. अंगावर घालण्यासाठी दररोज एक नवीन ड्रेस खरेदी करतात. आलिशान गाडी व आलिशान बंगल्यात राहतात. भारी भारी पंच पक्वान्न खातात आपले जीवन चैन विलासात जगतात. मग ते प्रशासनातील राजकीय लोक असतील अथवा विविध क्षेत्रातील मोठ्या पदावरील अधिकारी असतील, हे सगळेचजण चंगळवादी व आलिशान जीवन जगतात. या लोकांना आपण कोणाच्या जीवावर मजेत जगत आहोत आणि कोणाच्या जीवावर आनंदाने पोट भरत आहोत याचा जराही विचार ते करत नाहीत. तिकडे शेतकरी शेतात अन्नधान्य पिकवत आहे म्हणून इकडे आपले पोट मनसोक्त भरत आहे. केवळ शेतकऱ्यांच्या जीवावरच पूर्ण जग आनंदाने व सुखाने पोट भरत आहे. ज्या दिवशी सगळे शेतकरी एकत्र येऊन शेती पिकवायचे बंद करतील. त्यादिवशी सगळे जग ठप्प होईल आणि अख्या जगाला शेतकऱ्यांची किंमत कळेल. शेतकऱ्याविना अख्या जगाला उपाशी राहावे लागते, हे त्यांना कळेल. जन्मजात व गर्भ श्रीमंत लोकांना शेतकऱ्यांची काय किंमत कळणार? शेत पिकवण्यासाठी शेतकऱ्यांना किती नैसर्गिक संकटांना तोंड द्यावे लागते, याचा विचार केलाय का आपण कधी? पेरणी केल्यावर पूर्ण पीक हातात येईपर्यंत शेतकऱ्यांना किती कष्ट घ्यावे लागतात, महागडे खते व बी-बियाणे खरेदी करण्यासाठी पैसा कसा जोडावा लागतो? किती जणांचे पाय धरावे लागतात? सावकाराचे कसे कर्ज काढावे लागते? याचा कधीतरी विचार करून बघा. शेतकऱ्यांचे जीवन किती अवघड व कठीण असते हे तुम्हाला कळेल. ज्यांना शेतकऱ्यांच्या कष्टमय व दुःखमय जीवनाची करुण कहाणी माहित नाही, ज्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा व समस्या माहित नाहीत, त्यांनी स्वतः एक दिवस तरी शेतकरी होऊन शेतकऱ्यांचे जीवन एकदा तरी जगून पहावे...असे मला वाटते...



**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

गोंदी पोलिसांची कारवाई

# ३५ लाखांचा अवैध वाळू उपसा जप्त

**अंबड । प्रतिनिधी -** गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोडवाडी नदीपात्रात अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू उपशावर पोलिसांनी कारवाई करत सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक आणि पथकाने ही धडक कारवाई केली.

पोलीसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गोडवाडी येथे काही इसम अवैधरित्या वाळू उपसा करत होते. सदर ठिकाणी पोलीस पथकाने छापा टाकत एक ट्रॅक्टर, एक डंपर, एक लोडर आणि एक मारुती स्विफ्ट कार असा एकूण ३५,००,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाईदरम्यान काही आरोपी फरार झाले असून त्यात मनोज कळमण नाटकर (रा. गेवराई), मंगेश ऊर्फ सोन्याबा पिता माऊली चौधरी (रा. आपगाव), सोमेश्वर यांच्याचे कोकहार (रा. शेवाळा ता. शेवगाव) यांचा समावेश आहे.

ताब्यात घेतलेल्या वाहनचालकांमध्ये प्रकाश ऊर्फ पप्पू भगवान भालेराव (रा. आपगाव) याचे नाव असून त्याला घटनास्थळावरून अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशिष खांडारे, पोलीस नाईक फुलचंद हंडगे, दीपक जगताप, शशिकांत सिसोई, सलमान सय्यद, अब्दुल बशीर शेख तसेच गुन्हे शोध पथकातील फोजदार कडूळे यांच्या पथकाने केली.

केहाळ वडगाव जि. प. शाळेच्या शालेय व्यवस्थापण समितीची निवड

# अध्यक्षपदी सुरेश दवणे तर उपाध्यक्षपदी ओंकार नाईक




**मंठा । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ वडगाव शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सुरेश दवणे व उपाध्यक्षपदी ओंकार नाईक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ वडगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकालाची मुदत संपली असल्याने २०२५ ते२०२७ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी नवीन शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांची निवड करून समिती नव्याने गठीत करण्यात आली आहे यासाठी पालकांची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती केहाळ वडगाव येथील शालेय व्यवस्थापन समिती या सभेत गठन करण्यात आली समितीच्या अध्यक्षपदी सुरेश ज्ञानेश्वर दवणे उपाध्यक्षपदी ओंकार प्रदिपराव नाईकयांची निवड करण्यात आली आहे समितीच्या सदस्यपदी सौ. नीता विजय दवणे,सौ. कमल फकीरा साळवे. सौ.लता गजानन नाईक. सौ.कौशल्या रामचंद्र शिंदे, श्री दीपक डीगांमबरराव दवणे.श्री.संतोष शिवाजी दवणे. सौ शिंदू भागवत दवणे, सो. चंदा सुदर्शन दवणे,शिक्षण प्रेमी सोहम प्रल्हाद दवणे, चिरंजीव हर्षल सिद्धेश्वर दवणे,कुमारी ईश्वरी भरत दवणे, शिक्षक प्रतिनिधी श्री भुसकुटे डी. डी., सचिव पदी शाळेचे मुख्याध्यापक श्री एस. एन.चरकेवाड हे पदसिद्ध सचिव म्हणून निवड करण्यात आली यावेळी नूतन अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला यावेळेस विविध वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक तथा शिक्षण प्रेमी तुकाराम दवणे, राजेभाऊ नाईक,विजय दवणे, अशोक दवणे, सिद्धेश्वर दवणे पांडुरंग दवणे ओंकार दवणे,वसंत हरबक,कृष्णा गडदे, अशोक दवणे (गुरु )सतीश दवणे, पांडुरंग दवणे, गजानन नाईक, भरत दवणे,विठ्ठल दवणे,पवन नाईक, धनंजय दवणे यांची उपस्थिती होती, सूत्रसंचालन भुस्कुटे यांनी केले मुख्याध्यापक एस. एन. चरकेवाड यांनी मार्गदर्शन केले आभार कांबळे यांनी मानले

# संघ कार्यालयात भारत तिब्बत सहयोग मंच केंद्रीय बैठक संपन्न

**नवी दिल्ली -** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ केंद्रिय कार्यालय केशव कुंज दिल्ली येथे सरकार्यवाह माननीय दत्तात्रेय होसबाले जी,सह सरकार्यवाह माननीय डॉ.कृष्णगोपालजी,मंच के मार्गदर्शक माननीय डॉ.इन्द्रेश कुमार जी,पालक अधिकारी श्रीमान रुपेश कुमार जी यांच्यासोबत भारत तिब्बत सहयोग मंच राष्ट्रीय पदाधिकारी समवेत लघु टीमची बैठक संपन्न झाली.



भारत तिब्बत सहयोग मंच राष्ट्रीय परिषद बैठकीनंतर संघाच्या सर्वोच्च अधिकारी समवेत ही पहिलीच बैठक होती,या बैठकीदरम्यान राष्ट्रीय संगठन महामंत्री पंकज गोयल यांनी गत २५ वर्षांतील संगठन विकास व कार्यक्रमांचे वृत्त विस्ताराने सांगितले. सरकार्यवाह यांनी तिब्बत आणि भारताचे सामाजिक,सांस्कृतिक एवं बौद्धिक विषयांवर प्रकाश टाकला आणि संघटनेच्या तिब्बत देशाची आझादी आणि कैलास मानसरोवर मुक्ती याविषयी देशात होणाऱ्या आंदोलनांविषयी संतोष व्यक्त केला. यासोबतच प्रत्येक जिल्ह्यातील संघ पदाधिकारी समवेत सम्पर्क करत या चालू असलेल्या आंदोलनात्मक कार्याला गति देण्यासाठी मार्गदर्शन केले. या राष्ट्रकार्यात माननीय डॉ.इन्द्रेश कुमार जी यांच्यासमवेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय अधिकारी श्रीमान रुपेश कुमार जी पालक अधिकारी नात्याने भारत तिब्बत सहयोग मंच संघटनेला मार्गदर्शन करतील.

डॉ. इन्द्रेश कुमार यांनी संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आगामी सर्व कार्यक्रमांत क्षेत्र, प्रांत,जिल्हा स्तरावर संघाच्या पदाधिकारी यांच्या संपर्कात राहून समयानुकूल सहभागी होण्याचे निर्देश दिले आहेत...

या बैठकीस केंद्रीय बैठकीस संगठन महामंत्री पंकज गोयल, गेयरि डोलमा, आचार्य यशी फुनचोक, लामा जोदपा, रामकिशोर पसारी, सी. आर. चौधरी, नर्सिंग मेंगजि, गिरिराज किशोर, राजू पोद्दार, डॉ. अर्चना सरदाना, ॲड. रविंद्र गुप्ता, राजेन्द्र कामदार, श्रीमती श्वेता सैनी, कपिल त्यागी, दीपक शर्मा भारत तिब्बत सहयोग मंच राष्ट्रीय पदाधिकारी लघु टीम उपस्थित होती.

जनावरांची खरेदी विक्री बंद बाबत कुरैशी समाजाची बैठक

# मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार!



**जालना । प्रतिनिधी -** मागील काही महिन्यांमध्ये जनावरांची खरेदी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांसोबत बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी गाड्या पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यासाठी मोहीम उचलली होती. पोलिसांनीही त्यांची साथ देऊन व्यापाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करून जनावरे जप्त केली. त्याच्या विरोधात आज दिनांक १७ गुरुवार रोजी सायंकाळी पाच वा.च्या सुमारास कुरेशी समाजाच्या व्यापारांच्या वतीने शहरातील जूना जालना भागात कुरेशी मोहल्ला येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये वेगवेगळे निर्णय घेण्यात आले. आगामी एक-दोन दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणात मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असून विधानसभा आणि लोकसभेच्या प्रतिनिधी मार्फत आवाज उठवण्यासंदर्भात बैठकीत निर्णय घेण्यात आला.

पोलीस प्रशासन स्वतः सक्षम असताना पोलिसांनी बजरंग दल च्या कार्यकर्त्यांच्या सांगण्यावरून अनेक व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करून लाखो रुपयांची जनावरे जप्त केली. हा मोठा अत्याचार असून यापुढे जनावरांची खरेदी विक्री बंद करण्याचा निर्णय कुरेशी समाजाच्या वतीने घेण्यात आला. या बैठकीला कुरेशी समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालना बसस्थानकावर सुरक्षारक्षकांचा हैदोस; मद्यधुंद अवस्थेत महिलांना त्रास

कारवाईची तय्यबबापू देशमुख यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील मध्यवर्ती बसस्थानकावर सुरक्षेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षारक्षकच प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, काही सुरक्षारक्षक मद्यधुंद अवस्थेत बसस्थानक परिसरात महिलांशी गैरवर्तन करतात, तसेच प्रवाशांशी उद्धट वागणूक देतात.



या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) जालना शहराचे उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी विभागीय नियंत्रकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, या सुरक्षारक्षकांना स्थानिक आगारप्रमुखांचा पाठींबा आहे. त्यामुळे ते कोणत्याही अधीनस्थ अधिकाऱ्याचे आदेश पाळत नाहीत. रात्रीच्या सेवेमध्ये अनेक वेळा हे रक्षक सेवा काळात दारू पिऊन बसस्थानकात थैमान घालतात. तक्रारीत असा आरोपही करण्यात आला आहे की, मेस्को कंपनीच्या माध्यमातून नेमण्यात आलेले हे रक्षक बसस्थानकावर कायदा-सुव्यवस्थेला धक्का पोचवत आहेत. त्यांच्यावर कारवाई न झाल्यास भविष्यात गंभीर घटना घडू शकतात.

प्रवाशांनी आणि नागरिकांनी या प्रकारावर संताप व्यक्त केला असून, त्वरित चौकशी करून संबंधित सुरक्षारक्षकांवर तसेच ठेकेदार कंपनीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## राज्यातील सहकारी संस्थांसाठी 'सहकार पुरस्कार'; अर्ज करण्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदत

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील सहकारी चळवळीत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्थांना शासनामार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी विविध सहकार पुरस्कार दिले जाणार आहेत. या पुरस्कारांसाठी पात्र सहकारी संस्थांची निवड करण्यात येणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ आहे.
पुरस्कारांची संख्या खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे:
**सहकार महर्षी पुरस्कार - ०१**
**सहकार भूषण पुरस्कार - २१**
**सहकार निष्ठ पुरस्कार - २३**
या पुरस्कारांसाठी संस्थांची निवड कामकाजाच्या गुणवत्तेच्या आधारे केली जाणार आहे. अर्ज प्रक्रिया व आवश्यक माहिती https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच सर्व जिल्हा उपनिबंधक आणि तालुका सहकारी संस्थांच्या कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत आणि सक्रिय सहकारी संस्थांनी आपले प्रस्ताव ३१/०७/२०२५ पर्यंत संबंधित तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन सहायक निबंधक (प्रशासन) पी बी वरखडे, जालना यांनी केले आहे.

# घनसावंगी तालुक्यात ग्रापं आरक्षण सोडत; ४९ ग्रा. पं. वर महिलाराज

**घनसावंगी -** तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाची सोडत १५ जुलै रोजी तहसील कार्यालयातील सभागृहामध्ये उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी तहसीलदार मोनाली सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढण्यात आली. सोडतीत निघलेल्या आरक्षणानुसार ९६ ग्रामपंचायतपैकी ४९ ग्राम पंचायतीवर महिलाराज राहणार आहे. घनसावंगी तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षणामध्ये १३ ग्रामपंचायत या अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी ७ ग्रामपंचायती ह्या महिला संवर्गाकरिता राखीव ठेवण्यात आल्या. अनुसूचित जमाती या सवर्गाकरिता एकूण २ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी एक महिलांसाठी आरक्षित करण्यात आली. त्यानंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग याकरिता २६ ग्रामपंचायती राखीव करण्यात आल्या. १३ नागरिकांच्या मागास प्रवर्ग व १३ नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला या प्रवर्गासाठी चिठ्ठयाद्वारे आरक्षण काढण्यात आले. त्यानंतर उर्वरित ५५ ग्रामपंचायती ह्या सर्वसाधारण करिता उपलब्ध झाल्या. त्यापैकी २८ जागा सर्वसाधारण महिलांकरिता राखीव काढण्यात आल्या.

# अंबड येथे टेनिस हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

**अंबड । प्रतिनिधी -** जागतिक टेनिस हॉलीबॉल दिन निमित्त तसेच डॉ.व्यंकटेश वांगवाड यांच्या वाढदिवसा निमित्त जिल्हा क्रीडा टेनिस हॉलीबॉल संघटनेच्यावतीने अंबड येथील धाईतनगरच्या मैदानावर खुल्या टेनिस हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या संघांना प्रथम पारितोषिक २००१ रुपये व चषक तसेच द्वितीय पारितोषिक १५०१रुपये व चषक तसेच तिसरे पारितोषिक ५०१ रुपये व चषक असे देण्यात आले.यावेळी २५ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या संघातील पुरुष व महिलांचा संघ दिल्ली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे. दिल्ली येथील स्पर्धेसाठी रोख एक लाख रुपये पारितोषिक ठेवण्यात आले असल्याचे संबंधिततांकडून सांगण्यात आले. टेनिस हॉलीबॉल संघटनेचे राज्य सचिव गणेश माळवे , जालना जिल्हा टेनिस हॉलीबॉल संघटनेचे जिल्हा मार्गदर्शक प्रमोद खरात,अध्यक्ष रवीभाऊ चांगले यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली. यावेळी नागेश वराडे क्रीडा प्रशिक्षक, विशेष मार्गदर्शक हरिचंद्र जरांगे व बाबासाहेब वैराळ पत्रकार यांचीही उपस्थिती होती.

## जालना जिल्ह्यात सरासरी २७ मि.मी. पावसाची नोंद

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि. १७ जुलै २०२५ रोजी सकाळपर्यंतच्या मागील २४ तासात सरासरी २७ मि.मी एवढ्या एकूण पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात झालेल्या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी मि.मी. मध्ये पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी यंदाच्या एकूण पावसाची आहे. जालना- १३.८० (२९.२०), बदनापूर- १४.२० (३३.८३), भोकरदन- ३.१० (३९.५४), जाफ्राबाद- ०.०० (४०.५३), परतूर- ५७.८०(२२.२२), मंठा- ४.९०(१९.९४), अंबड- ३४.५० (२४.८८), घनसावंगी- ८९.७० (२८.२३) मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात आज पर्यत एकुण ३०.१४ मि.मी. एवढ्या पावसाची नोंद करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## पारशी टेकडी ...

या पारशी टेकडीचा काही भाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात आहे. मात्र औद्योगिक वसाहतीच्या फेस ३ च्या नावाखाली औद्योगिक विकास महामंडळाने जालना शहरातील उद्योजकांना या पारशी टेकड़ीवरील भूखंड विकून त्याचे वाटप केले आहे. आज तेथे उद्योग विकासीत करण्याचे काम सुरु आहे. भूखंड नावावर असलेल्या भूखंडधारकांनी पारश टेकड़ी परिसरात उत्खनन करून हजारो हायवा मुरूम ( गौनखनीज) उकरून नेला आहे. यासाठी पारशी टेकडी येथील काही भागात जवळपास १५० ते २०० फूट उभा डोंगर कापण्यात आलेला असून तो धोकादायक झालेला आहे. डोंगराचा मुरूम काटून कापलेला भाग कधीही कोसळून मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही भूखंडधारक डोंगरावर बांधकाम करण्यासाठी उत्खनन काम करत आहेत ते सुद्धा अतिशय धोकादायक ठरू शकते. याकडे जिल्हा प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.मुळात औद्योगिक विकास महामंडळास नैसर्गिक साधन संपत्ती असलेल्या भागाचे संवर्धन करणे आवश्यक असतांना त्यांनी चक्क डोंगराचा काही भाग उद्योग व्यवसायासाठी विकला आहे, ही बाब गंभीर व नियमबाह्य आहे. महसूल विभागाच्या पूर्व परवानीने गौनखनीज काढून नेणे हा गुन्हा असताना पारशी टेकडीवरील भूखंड धारक उद्योजक डोंगर पोखरून मोठ्या प्रमाणात गौनखनीज काढून नेत आहेत. यामुळे पारशी टेकडीचे मोठ्या प्रमाणात भूखलन होउन मोठी दुर्घटना होऊ शकते. पारसी टेकडी आणि परिसरात होणारे उत्खनन तत्काळ थांबवावे. टेकडीवर कुठलेही बांधकाम होऊ नये यासाठीच्या कडक सुचनाऔद्योगिक विकास महामंडळासह संबधित विभागांना द्याव्या. आणि पारसी टेकडीचे संरक्षण करावे. डोंगराच्या परिसरात फक्त आणि फक्त झाडे लावावीत त्यांचे जतन व्हावे. डोंगराचे उत्खनन करण्यास पूर्णतः बंदी घालण्यात यावी.तसेच बेकायदेशीर गौनखनीज काढून नेणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाई करावी ,अशी मागणीही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## संच मान्यता व ...

अतिरिक्त होण्याचा आणि विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शाळा व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गंभीर प्रश्न निर्माण होणार आहेत. ते टाळण्यासाठी संचमान्यता व विविध उपक्रमांतर्गत लाभ पुर्वी प्रमाणेच ३० सप्टेबर च्या पटसंख्येवरच कायम ठेवावेत गंभीर समस्या व अप्रिय घटना टाळाव्यात असे राजकुमार कदम यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## एक्युप्रेशर, सुजोक ...

जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, विनोद बियाणी, पुसाराम मुंदडा, महेश सारडा, सुनिल बियाणी, सतिश राठी, शिवप्रसाद गट्टाणी संतोष सारडा, ललित चेचानी, राजेंद्र मंत्री, महेंद्र लड्ढा, डॉ आशुतोष सोनी, आर आर मंत्री, शाम लखोटिया, सुधिर मंत्री, प्रा. स्वप्निल सारडा, रामेश्वर मंत्री, सुभाष झंवर, द्वारकादास चेचाणी, सुभाष सोनुने, शांतिलाल सकलेचा, मनोज बजाज, जितेन्द्र मुंदडा आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नमो शेतकरी ...

राज्य शासनाने सुद्धा महाराष्ट्र राज्यातील अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्न वाढीसाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा थकित निधी तात्काळ शेतक-यांच्या खात्यावर जमा करावा व केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकाने सुद्धा नमो शेतकरी महासन्मान योजना पूर्ववत सुरू ठेवावी, अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

## मोटार सायकल चोरी ...

व त्यांच्या टीमने लोधी मोहल्ल्यात सापळा रचून गितेश ऊर्फ गितू अमरसिंग राजपूत (२२) व निलेश राजेश बनसोडे (२१) या दोन आरोपींना ताब्यात घेतले.
प्राथमिक चौकशीत आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना १९ जुलै २०२५ पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पुढील तपासात त्यांनी सदर बाजार व इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एकूण ८ मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. त्यांनी चोरीचा मुद्देमाल एसआरपीएफ पाण्याच्या टाकीशेजारी असलेल्या दाट झुडपांत लपवून ठेवल्याचे उघड झाले.
पोलिसांनी घटनास्थळी जाऊन वेगवेगळ्या कंपनीच्या एकूण ८ मोटारसायकली हस्तगत केल्या असून, यातील २ गुन्हे सदर बाजार व कदीम जालना पोलीस ठाण्यात नोंदवले आहेत.
ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी व पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.
**कारवाईत सहभागी कर्मचारी** पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ. रामप्रसाद रंगे (५९३), जगन्नाथ जाधव (१२६७), धनाजी कावळे (१०७०), नजीर पटेल (१३९३), भगवान मुंजाळ (१३०८), जिम शेख (२३०), गोफणे (९६३), गणेश नेजनकर (१५१९), राहुल कटकम (१४४६), तसेच चालक कल्पेश पाटील (९९६) आदींचा सहभाग उल्लेखनीय होता.

## आगामी निवडणुकांची ...

ठराव करण्यात आला . यावेळी मंठा तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समिती च्या निवडणूका लढविण्याचा तालुका पदाधिकाऱ्यांनी बैठकीत निर्धार व्यक्त केला. सदरील बैठक वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके,जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर खरात यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व तालुकाध्यक्ष सुभाष जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी प्रमुख उपस्थिती जिल्हा महासचिव डॉ किशोर त्रिभूवन, जिल्हा सचिव देवीदास कोळे , जिल्हा सदस्य भारत उघडे, रामप्रसाद थोरात, समाधान तोडके, बाबासाहेब गालफाडे,तालुका उपाध्यक्ष नारायण ढाकरगे, एकनाथ मानकर , आशिष मोरे, अमोल मस्के, दिलिप मगर ,भिमराव सदर, प्रकाश जाधव, दादाराव साळवे, केशव राक्षे, साईनाथ मोरे, युसूफ भाई शाहिर, गौतम मगर, दिलीप मगर, सुधाकर खरात, कार्तिक कामिटे ,सुरज गवळी ,राजु दाहिजे यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारसी टेकडीचे संरक्षण करा

# डोंगर उत्खननावर पूर्णतः बंदी घालण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हा प्रशासनाच्या नेतृत्वात विविध सामाजिक संस्था संस्था आणि सर्वसामान्य नागरिकाच्या कष्टातून उभे असलेले पारसी टेकडी डोंगर हे ठिकाणपर्यावरण संवर्धनाचे एक उत्कृष्ट मॉडेल म्हणून ओळखल्या जाते.

अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने पर्यावरणाचा समतोल राखल्या जावा म्हणून पारसी टेकड़ी या डोंगरावर कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने जलसंवर्धानाचे काम झालेले आहे तसेच ३.५ लाख वृक्षांची लागवड करण्यात आलेली असून त्यांचेसंवर्धन कार्य सुरू आहे. प्राण्यांसह विविध पशू पक्षी आणि जीवजंतूचा नैसर्गिकआधिवास तेथे आहे.

कमी पर्जन्यमान असलेल्या आपल्या सारख्या दुष्काळी भागातील डोंगर नष्ट झाले तर परिस्थिती आणखी भयावह होणार आहे.

जालना जिल्ह्याचे वनक्षेत्र हे महाराष्ट्रात अतिशय अल्प असून वनक्षेत्रविकसित करण्याच्या दष्टीने हा एक महत्वपूर्ण उपक्रम आहे. शहर आणि ग्रामीणभागासह बाहेर जिल्ह्यातील सा. संस्थांनी येथे वृक्षारोपण संवर्धनाचे मोठे काम केलेले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पारसी टेकड़ी आणिपरिसरात भूखंड विक्री करून विकासीत करण्याचे काम सुरू आहे.

पारसी टेकड़ीपरिसरात उत्खनन करून हजारो हायवा मुरूम काढून नेण्यात आलेला आहे.

पारसी टेकर्डी येथील काही भागात जवळपास १५० ते २०० फूट उभा डोंगर कापण्यात आलेला असून तो धोकादायक झालेला आहे. डोंगराचा मुरूम काटूनकापलेला भाग कधीही कोसळून मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

काही भूखंडधारक डोंगरावर बांधकामकरण्यासाठी उत्खनन काम करत आहेत ते सुद्धा अतिशय धोकादायक ठरू शकते.

प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची भावना पर्यावरण प्रेमीनागरिक व्यक्त करत असून याबाबत रोष वाढत आहे.

अशा प्रकारे पारसी टेकडीसारखा डोंगर भुईसपाट करणे पूर्णपणे नियमबाह्य आहे. वाढते प्रदुषण आणि पर्यावरणाचा समतोल राखल्या जाईल, प्राण्यांचा पशूपक्ष्यांचा अधिवास सुरक्षित राहील याची दक्षता घेणे आपले कर्तव्यआहे.

आपण पारसी टेकडी आणि परिसरात होणारे उत्खनन तत्काळ थांबवावे. टेकडीवर कुठलेही बांधकाम होऊ नये यासाठीच्या कडक सुचनाऔद्योगिक विकास महामंडळासह संबधित विभागांना द्याव्या. आणि पारसी टेकडीचे संरक्षण करावे.

डोंगराच्या परिसरात फक्त आणि फक्त झाडे लावावीत त्यांचे जतन व्हावे. डोंगराचे उत्खनन करण्यास पूर्णतः बंदी घालण्यात यावी.

अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली असून निवेदनावर रमेश देहेडकर, सौ. रसना देहेडकर, श्रीकांत शेलगावकर, दिनकर घेवंदे, धर्मा खिल्लारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणार!

# जालना विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक घरकुलांना मंजुरी - आ. अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जालना विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे एकूण १२ हजार २०७ घरकुलांना मंजुरी मिळविली आहे. मागील दोन वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली असून घरकुलांचा निधी लाभार्थींच्या थेट खात्यावर वितरितही झाला आहे. बेघर तसेच कच्ची घरी असलेल्या सर्वसामान्य कुटुंबासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुलांना मंजुरी आणल्याचा मला विशेष आनंद आणि समाधान असल्याचे माजी राज्यमंत्री, आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

आमदार खोतकर यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हेच आपले ध्येय आहे. जालना शहरात सुमारे ३०० कोटींची कामे सुरू आहेत. रस्ते, नाल्या, सभागृह, संरक्षण भिंत,चौक आणि ओपन स्पेस सुशोभीकरण अशा विविध प्रकारच्या कामांचा त्यात सम ावेश आहे. देवी, गणपती, छटपूजा अशा मूर्ती विसर्जनासाठी मोती तलाव येथे (संभाजी तलाव) ११ कोटी रुपये खर्चून विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. अंबड येथील फिल्टर प्लांटचे तसेच शहरातील पाण्याच्या टाक्यांचे काम प्रगतीपथावर आहे. सौर ऊर्जा प्रकल्पही (घाणेवाडी तलावनजीक) लवकरच कार्यान्वित होईल. आणि दिवाळीनंतर जालनेकरांना दररोज अथवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे स्वप्नदेखील होणार आहे.



**घरकुलांचे स्वप्न पूर्ण**

माझ्या जालना विधानसभा म तदारसंघातील ६२ गावांमध्ये एकूण बारा हजार २०७ घरकुलांना आपण मंजुरी मिळविली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत ६० टक्के आणि राज्य पुरस्कृत ४०% अशा स्वरूपात आहे. मंजूर घरकुलांमध्ये ८८२५ केंद्रपुरस्कृत आणि ३३८२ राज्य पुरस्कृत आहेत. २०२४_२५ आणि २५ २६ या वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली आहेत. मंजूर घरकुलांची कामेही प्रगतीपथावर आहेत. आपण निवडणुकीत घरकुलांचा शब्द दिला होता. बेघर आणि गोरगरिबांसाठी इतक्या मोठ्या प्रम ाणात घरकुले मंजूर करून आणल्याचे समाधान आणि विशेष आनंद वाटतो असेही आमदार खोतकर यांनी आवर्जून म्हटले आहे. आपल्या कारकिर्दीत जालना शहर आणि ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदललेला दिसेल. निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणे याच ध्येयाने आपण अहोरात्र कामाला लागलो असल्याचे आमदार खोतकर यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक वार्डात सुरू असलेल्या विकास कामांमुळे नागरिकांतूनही आपल्याला समाधानकारक प्रतिक्रिया ऐकायला मिळत आहेत.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.